# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## (नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठातर्फे शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता नवीन महाविद्यालय, विद्याशाखा, अभ्यासक्रम, विषय व वाढीव तुकड्याकरीता अर्ज आमंत्रित**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ च्या कलम १०९ (३) (a) अन्वये शैक्षणिक सत्र २०२०-२१ करीता नवीन महाविद्यालय, अभ्यासक्रम, विद्याशाखा, विषय व वाढीव तुकड्यांकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. महाविद्यालयांनी तसेच संस्थांनी दिनांक १९ ऑगस्ट, २०१९ पर्यंत अर्ज विद्यापीठात सादर करावयाचे असून त्यानंतर आलेले अर्ज विचारात घेतल्या जाणार नाहीत.

संबंधितांनी अर्ज विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचे असून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने म्हणजेच व्हिडीओ आणि प्रचलित हार्डकॉपीमध्ये सहा प्रति विद्यापीठाकडे सादर करावयाच्या आहेत. संस्थेमध्ये असलेल्या सोयी-सुविधा व कर्मचारी आणि शिक्षकांच्या विषयीचे व्हिडीओ चित्रीकरण करावे व सदर प्रस्ताव हा डीव्हीबी-टीटीसुरेख फॉन्टमध्येच विद्यापीठाकडे पाठवावा.

विद्यापीठाने शैक्षणिक सत्र २०२०-२१ च्या वार्षिक बृहत आराखड्यामध्ये विविध नवीन अभ्यासक्रम व विषय प्रस्तावित केले असून त्यामध्ये अमरावती जिल्ह्यातील अमरावती, बडनेरा, नांदगांव पेठ, वलगांव, चांदुररेल्वे, अचलपूर, दर्यापूर, दारापूर, मोर्शी, तिवसा, नांदगांव खंडेश्वर, वरुड, जरुड, धामणगांव रेल्वे, धारणी, चिखलदरा, येवदा, शेंदूरजना घाट, अकोला जिल्ह्यातील अकोला, मुर्तिजापूर, बार्शी टाकळी, पिंजर, अकोट, पातुर, बुलढाणा जिल्ह्यातील बुलढाणा, देऊळगांव राजा, देऊळगांव मही, नांदुरा रेल्वे, मलकापूर, खामगांव, शेगांव, साखरखेर्डा, लोणार, लाखनवाडा, चिखली, यवतमाळ जिल्ह्यातील यवतमाळ, पुसद, उमरखेड, महागांव, नेर परसोपंत, दारव्हा, बुरंडा, वणी व वाशिम जिल्ह्यातील वाशिम, मानोरा, मंगरुळपीर आदींचा समावेश आहे.

सदर अर्जासोबत भरावयाचे विहित शुल्क वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे नावे धनाकर्ष काढून विद्यापीठ खाती जमा करावा. सदर अर्ज विक्रीकरीता संत गाडगे बाबा अमरावी विद्यापीठ कर्मचारी पतसंस्था, अमरावती येथे उपलब्ध आहेत. याबाबत सविस्तर माहिती विद्यापीठाने सर्व संलग्नित संस्थाचे अध्यक्ष/सचिव यांना पत्र पाठवून कळविले आहे. अर्जाबाबतची सविस्तर माहिती विद्यापीठाच्या www.sgbau.ac.in या संकेतस्थळावर दिलेली आहे. अधिक माहितीकरीता भ्रमणध्वनी क्रमांक ७२४९४१९०४० व दूरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६२४५ यावर संपर्क साधता येईल, असे विद्यापीठाच्यावतीने कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांनी कळविले आहे.

---

प्रति,
मा.संपादक/जिल्हा प्रतिनिधी,
दै. ............................
अमरावती.

**जनसंपर्क विभाग**
दि. ०७/०८/२०१९.

कृपया सोबतचे वृत्त आपल्या लोकप्रिय दैनिकात सविस्तर प्रकाशित करावे, ही विनंती.

आपला,

जनसंपर्क अधिकारी